पीकपाणी

# खरिपातील सुधारित मूग लागवड तंत्रज्ञान




प्रा. संजय बडे
(मो.नं. ७८८८२९७८५९)
दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय,
दहेगाव, ता. वैजापूर जि. औरंगाबाद






खरीप मुगाची पेरणी साधारणतः पाभरीने करावी. पेरताना दोन ओळींतील अंतर ३० सें.मी. व दोन रोपांतील अंतर १० सें.मी. ठेवल्यास हेक्टरी रोपांची संख्या योग्य राखली जाईल. पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा आणि २५ ग्रॅम रायझोबियम जिवाणूसंवर्धक पावडर गुळाच्या थंड द्रावणात मिसळून लावावी; त्यामुळे पिकांची उगवण चांगली होऊन उत्पादनात वाढ होते.

**क**डधान्ये पिकांमध्ये कमी कालावधीत (७० ते ७५ दिवस) तयार होणारे मूग हे महाराष्ट्र राज्यातील महत्त्वाचे पीक आहे. हे पीक खरीप व उन्हाळी हंगामात घेतले जाते. मूग हे डाळवर्गीय पीक असून या पिकाच्या मुळांवरील गाठीतील रायझोबियम जिवाणूंमार्फत हवेतील नत्र शोषून त्याचे मुळांवरील ग्रंथींमध्ये स्थिरीकरण केले जाते; त्यामुळे इतर पिकांकरिता उत्तम बेवड तयार होतो. तसेच हे पीक जमिनीत गाडल्यास त्याचे हिरवळीचे खत जमिनीचा कस व पोत सुधारण्यास मदत करते.

**जमिनीची निवड :** जमीन ही पाण्याचा उत्तम निचरा होणारी, मध्यम ते भारी योग्य ठरते.

**हवामान :** २१ ते २५ अंश सेल्सिअस तापमान चांगले मानवते मात्र ३० ते ३५ अंश सेल्सिअस तापमानातही हे पीक चांगले येते. मूग पिकाला ६५० ते ७०० मि.मी. समप्रमाणात पडलेला पाऊस मानवतो.

**पूर्वमशागत :** मुगासाठी जमीन लागवडयोग्य करताना खोल नांगरणी करून भुसभुशीत करावी. पूर्वीचे पीक निघाल्यावर उन्हाळ्यात खोल नांगरट करावी. त्यानंतर मृगाचा पहिला मोठा पाऊस पडून गेल्यावर वखर पाळी



**शिफारशीनुसार वाणांची निवड सुचविणारा तक्ता**

| अ. क्र. | वाणाचे नाव | कालावधी (दिवस) | उत्पादन (क्विंटल प्रतिहेक्टरी) | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|
| १ | बीएम-२००२-०१ | ६५ ते ७० | १२ ते १४ | दाणे टपोरे, शेंगा लांब, भुरी रोग प्रतिकारक्षम |
| २ | बीएम-२००३-०२ | ६५ ते ७० | १२ ते १४ | दाणे टपोरे, शेंगा लांब, भुरी रोग प्रतिकारक्षम व अधिक उत्पादन. |
| ३ | बीएम-४ | ६० ते ६५ | १० ते १२ | खरीप व उन्हाळी हंगामासाठी योग्य |
| ४ | फुले एम-२ | ६० ते ६५ | १० ते १२ | खरीप व उन्हाळी हंगामासाठी योग्य |
| ५ | बीपीएमआर-१४५ | ६० ते ६५ | ७ ते ८ | लांब शेंगा, दाणे चमकदार |
| ६ | वैभव | ७० ते ७५ | १४ ते १५ | अधिक उत्पादन, भुरी रोग प्रतिकारक्षम |
| ७ | पीकेव्हीएमकेएम-४ | ६५ ते ७० | १२ ते १५ | अधिक उत्पादन, मध्यम आकाराचे दाणे |

घालून घ्यावी. धसकटे, काडीकचरा व इतर अवशेष वेचून घ्यावे. कुळवाच्या एक-दोन पाळ्या देऊन जमीन तयार करून पेरणीस योग्य होईल अशी करावी.

**पेरणीची योग्य वेळ :** मृगाचा पहिला पेरणीयोग्य पाऊस झाल्यावर व जमिनीत वापसा येताच जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यात पेरणी पूर्ण करावी. पेरणीस फार उशीर करू नये. शक्यतो १० जुलैनंतर मूग पिकाची पेरणी करणे टाळावे.

**बियाण्याचे प्रमाण :** हेक्टरी रोपांची संख्या योग्य प्रमाणात राखण्यासाठी हेक्टरी १५ ते २० किलो बियाणे वापरावे.

**लागवडीची पद्धत व अंतर :** खरीप मुगाची पेरणी साधारणत: पाभरीने करावी. पेरताना दोन ओळींतील अंतर ३० सें.मी. व दोन रोपांतील अंतर १० सें.मी. ठेवल्यास हेक्टरी रोपांची संख्या योग्य राखली जाईल.



**बीजप्रक्रिया :** पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा व २५ ग्रॅम रायझोबियम जिवाणूसंवर्धक पावडर गुळाच्या थंड द्रावणात मिसळून लावावी; त्यामुळे पिकांची उगवण चांगली होऊन उत्पादनात वाढ होते.

**पाणी व्यवस्थापन :** मूग हे पीक पावसावर येणारे आहे. या पिकाला फुले येताना आणि शेंगा भरताना ओलाव्याची कमतरता भासू लागते; अशा परिस्थितीत पाऊस नसेल आणि जमिनीत ओलावा खूपच कमी झाला असेल तर फुले येणे व शेंगा भरणे या अवस्थेत हलके पाणी द्यावे.

**विद्राव्य खतांची फवारणी :** फुलोरा अवस्थेत असताना दोन टक्के युरिया म्हणजे २० ग्रॅम प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारावे व शेंगा भरत असताना दोन टक्के डी.ए.पी. म्हणजे २० ग्रॅम प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारावे.

**खत व्यवस्थापन :** चांगले कुजलेले शेणखत ५ टन प्रतिहेक्टरी हे शेवटच्या कुळवणीच्या वेळी शेतात पसरवून द्यावे. यानंतर रासायनिक खतांची मात्रा देताना पेरणीच्या वेळी २० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद व ३० किलो पालाश प्रतिहेक्टरी देणे आवश्यक आहे. नत्र व स्फुरद एकाच वेळी पेरणीच्या वेळेस जमिनीत बियाण्याच्या खाली पेरून द्यावे.

**पीकसंरक्षण :** या पिकावर प्रामुख्याने भुरी व पिवळा विषाणू या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. भुरीमध्ये मूग पिकाच्या खालील पानावर पांढरे ठिपके दिसतात व काही दिवसात पानांच्या बऱ्याचशा भागावर अनियमित आकाराचे पिवळे चट्टे दिसू लागतात या रोगाच्या नियंत्रणासाठी पाण्यात विरघळणारे गंधक १२५० ग्रॅम किंवा ५०० ग्रॅम कार्बेंडाझिम अधिक ३० टक्के प्रवाही डायमेथोएट ५०० मि.ली. ५०० लिटर पाण्यातून प्रतिहेक्टरी फवारावे. शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरिफॉस २० ईसी-२० मि.लि. प्रति १० लिटर पाणी या कीडनाशकाची फवारणी करावी.

मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० ईसी-१५ मि.लि. प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे.

**उत्पादन :** योग्य नियोजनातून खरीप मुगाचे १२ ते १५ क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते.

■